# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

जा.क्र./भिनिशमनपा/करमुल्यांकन विभाग/ ९२ee

दिनांक - १० /१२/२०२४

## आदेश

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या मिळकतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 127 (1) (अ) कलम 129 तसेच अधिनियमाचे अनुसची "ड" मधील प्रकरण 8 चे कराधान नियम मधील तरतुदीनुसार "**मालमत्ता कर**" आकारणी व वसुली करण्यात येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनूसची "ड" चे प्रकरण 8 कराधान नियम 51 नुसार आयुक्तांना आपल्या स्वेच्छनिर्णयानुसार नियम 41 खालील शास्ती किंवा नियम 50 खालील फी किंवा वसुलीचा खर्च पूर्णत: किंवा अंशत: माफ करता येईल, असे नमूद आहे.

सदर नियमाअंतर्गत आयुक्तांचे स्वेच्छानिर्णयानुसार **प्रथम कर भरणाऱ्यास कराच्या शास्तीमध्ये सूट (व्याजातसूट)** या तत्वावर मागील थकबाकी व चालू मागणीसह संपूर्ण मालमत्ता कराची रक्कम एक रक्कमी भरणा करणाऱ्या करदात्यास अशी माफी दिल्यास मालमत्ता कराची रक्कम वसूल होण्यास मदत होईल. त्या अनुषंगाने प्रस्तावित "**अभय योजना** 2024-2025 **टप्पा**-3" चा तपशील पुढील प्रमाणे आहे.

1. **योजनेचा कालावधी** :-

अ) दि. **१२ डिसेंबर २०२४ ते** दि. **१७ डिसेंबर २०२४** रोजी पर्यंत कर भरणाऱ्या करदात्यास शास्तीमध्ये (व्याजामध्ये) 100% माफी देण्यात येईल.

2. **योजनेची व्याप्ती** :-

अ) सदर योजने अंतर्गत मालमत्ता कर थकबाकी असलेल्या करदात्यांना लाभ घेता येईल.

ब) योजनेच्या कालावधीत करदात्यांकडे प्रलंबित असलेल्या मूळ रक्कमेचा एक रक्कमी 100 टक्के भरणा महानगरपालिकेकडे केल्यास प्रलंबित रक्कमेवर नियम 41 नुसार प्रतीमहा 2 टक्के दराने आकरण्यांत येणारी शास्ती व नियम 50 खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क व वसुलीचा खर्च माफ करण्यात येईल.

3. **योजनेचा लाभ खालील बाबींसाठी अनुज्ञेय असेल** :-

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" मधील प्रकरणे 8 (कराधान नियम) मधील नियम 41 खालील शास्ती किंवा नियम 50 खालील फी किंवा वसुलीचा खर्च पूर्णत: माफ करता येईल.

2) सदर योजना ही वर नमुद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमांना लागू राहिल या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्ती नंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमाच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

3) मोबाईल टॉवरर्स कंपन्यांना शास्तीमध्ये सूट (व्याजातसूट) ही योजना अनुज्ञेय राहणार नाही.

4. **योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी करावयाचा भरणा व अपील मागे घेणे इ. साठी लागू असलेल्या अटी व शर्ती** :-

**अ)** ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे त्या कालावधीत कोणतेही प्रलंबित असलेले अपील पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्थरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
संगणक विभाग
आवक क्र. ८७८
दिनांक १० / १२ /२०२४

श्री. तिकोणे.
plz Upload on website. लिपीक
१०/१२/२४
सिस्टम मॅनेजर १०/१२/२४

ब) जन अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील पुर्ननिरीक्षणासाठी आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्थरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका दाखल केली तर योजनेअंतर्गत संबंधीत कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.

5. **आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे :-**
महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 69, कलम 128 तसेच अधिनियमातील अनुसूची "ड" मधील प्रकरण 8 चे कराधान नियम 51 नुसार आयुक्तांना असलेले शास्ती फी किंवा वसुलीचा खर्च माफ करणे बाबतचे अधिकार दि. **१२ डिसेंबर २०२४ ते** दि. **१७ डिसेंबर २०२४** या कालावधीत सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. 1 ते 5 यांना प्रदान करण्यात येत आहेत. उक्त कालावधी नंतर सदरचे अधिकार आपोआप संपुष्टात येतील.

6. **योजने अंतर्गत कार्यवाही विषयक बाबी :-**

अ) सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती 1 ते 5 यांनी **"अभय योजना 2024-2025 टप्पा-3"** राबविण्यासाठी मागणी पुस्तकात सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराची संपूर्ण रक्कम भरणा केल्यानंतर घ्यावी व सदर नोंद सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती यांनी प्रमाणीत करावी.

ब) संगणक विभाग प्रमुख यांनी **"अभय योजना 2024-2025 टप्पा-3"** राबविण्यासाठी संगणक प्रणालीत योग्य सुधारणा/ बदल तात्काळ करावे. त्या अनुषंगाने मालमत्ता कराची रक्कम भरणा करणेसाठी उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणी करदाता ज्या क्षणास कराचा भरणा करेल त्या क्षणास (Real Time) नियम 41 खालील शास्ती व नियम 50 खालील फी किंवा वसुलाचा खर्च माफ करणेबाबत बदल करावेत व तशी पावती/दाखला करदात्यास देण्यात यावा.

7. **योजनेची जाहीरात व प्रसिध्दी :-**
**"अभय योजना 2024-2025 टप्पा-3"** राबविण्यासाठी नागरीकांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेचा तपशिलाबाबत केबल, वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमे, मनपा संकेतस्थळ, दवंडी इत्यादीद्वारे व्यापक प्रसिध्दी देणे करिता जनसंपर्क विभागाने कार्यवाही करावी. सदर आदेशाची सर्व संबंधीत विभाग प्रमुखांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**(शैलेश दोंदे)**
**प्र.उप -आयुक्त (कर)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरापालिका**

**मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मान्यतेने**

**प्रति,**

1. **मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
2. **मुख्यलेखा परिक्षक**
3. **सहाय्यक आयुक्त (कर)**
4. **सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. 1 ते 5**
5. **जनसंपर्क अधिकारी**
6. **विभाग प्रमुख, करमुल्यांकन विभाग**
7. **संगणक विभाग प्रमुख**

**प्रत : माहिती करिता**

1. **मा.अतिरिक्त आयुक्त**
2. **मा.उप-आयुक्त (मुख्यालय)**